# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## बुधवार, दिनांक ९ ऑगस्ट, २०१७

## (सकाळी ११.०० वाजता)

एक : प्रश्नोत्तरे -

(क) तारांकित प्रश्न.

(ख) तारांकित प्रश्नाची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे —

मुख्यमंत्री : "मुंबईतील अंधेरी येथील सिटी सर्वे नं.१९८ (पार्ट) गिल्बर्ट हिल येथे सुरु असलेल्या प्रकल्पाबाबत" या विषयावरील श्री.परशुराम उपरकर, माजी वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक १८६९३ ला दिनांक २७ जुलै, २०११ रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

(ग) अतारांकित प्रश्नोत्तरांची आठवी व नववी यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

दोन : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे -

(क) मुख्यमंत्री : "नागपूर मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड, नागपूर यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(ख) वित्त व नियोजन मंत्री : (१) महाराष्ट्र पाटबंधारे वित्तीय कंपनी मर्यादित यांचा सन २०११-२०१२ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(२) "मॅफको महामंडळाचा सन २०१४-२०१५ व सन २०१५-२०१६ या वर्षांचा अनुक्रमे चव्वेचाळीसावा व पंचेचाळीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(३) "शासनाच्या सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागांतर्गत संस्थानी दिनांक १ एप्रिल, २०१६ ते ३१ मार्च, २०१७ या कालावधीत घेतलेले कर्ज व त्यावरील व्याजास देण्यात आलेल्या हमी विषयीचे विवरणपत्र" सभागृहासमोर ठेवतील.

(ग) उच्च व तंत्र : (१) "संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ,

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | *शिक्षण व सांस्कृतिक कार्य मंत्री* | | | *अमरावती यांचे सन २०१५-२०१६ या वर्षाचे वार्षिक लेखे" सभागृहासमोर ठेवतील.* |
| | | | *(२)* | *"राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.* |
| | | | *(३)* | *"उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा सव्वीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.* |
| | | | *(४)* | *"विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाचा सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षातील योजनेत्तर व योजनातंर्गत योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील" सभागृहासमोर ठेवतील.* |
| *(घ)* | *ग्रामविकास मंत्री* | *:* | *(१)* | *"सन २०१४-१५ या महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील चव्वेचाळीसावा लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.* |
| | | | *(२)* | *"सन २०१५-१६ चे ठाणे / रायगड / रत्नागिरी / सिंधुदुर्ग / पालघर / नाशिक / धुळे / नंदुरबार / जळगांव / अहमदनगर / पुणे/ सातारा/ सांगली / सोलापूर / कोल्हापूर / औरंगाबाद / जालना / परभणी / हिंगोली / बीड / नांदेड / उस्मानाबाद / लातूर / अमरावती / अकोला / वाशिम / बुलढाणा / यवतमाळ / नागपूर / वर्धा / भंडारा / गोंदिया / चंद्रपूर व गडचिरोली या ३४ जिल्हा परिषदांचे वार्षिक प्रशासन अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.* |
| *(ङ)* | *जलसंपदा मंत्री* | *:* | *"कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांचा सन २०१४-२०१५ या कालावधीच्या लेख्यावरील भारताचे नियंत्रक व महालेखापाल यांचा अलग* | |

*लेखा अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.*

| | | | |
|---|---|---|---|
| *(च)* | *पर्यावरण मंत्री* | : | *"महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचा सन २०१४-२०१५ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.* |
| *(छ)* | *ऊर्जा मंत्री* | : | *"महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनी मर्यादित यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा अकरावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.* |
| *(ज)* | *पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री* | : | *"महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचा सन २०१३-२०१४ या वर्षाचा वार्षिक अहवाल, वार्षिक लेखे आणि लेखापरिक्षण अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.* |
| *(झ)* | *मत्स्यविकास मंत्री* | : | *"महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०१३-२०१४ या वर्षाचा बेचाळीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.* |
| *(ट)* | *कामगार व माजी सैनिकांचे कल्याण मंत्री* | : | *(१) "सोलापूर जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, सोलापूर यांचा सन २००८-२००९ या वर्षाचा विसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.* |
| | | | *(२) "कोल्हापूर जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, कोल्हापूर यांचा सन २०१०-२०११ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.* |
| | | | *(३) "नांदेड माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, नांदेड यांचा सन २०११-२०१२ व सन २०१२-२०१३ या वर्षांचा अनुक्रमे विसावा व एकविसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.* |
| | | | *(४) "अहमदनगर माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, अहमदनगर यांचा सन २०११-२०१२ व सन २०१२-२०१३ या वर्षांचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.* |
| | | | *(५) "औरंगाबाद माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, औरंगाबाद यांचा सन २०११-२०१२, सन २०१२-२०१३ व सन २०१३-२०१४ या वर्षांचा अनुक्रमे विसावा, एकविसावा व* |

*बाविसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.*

(६) *"किराणा बाजार व दुकाने मंडळ (बृहन्मुंबई, ठाणे आणि रायगड जिल्ह्यांकरीता) यांचा सन २०१४-२०१५ या वर्षाचा पंचेचाळीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.*

(७) *"लातूर व उस्मानाबाद जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, लातूर यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा पंचविसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.*

(८) *"नाशिक माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, नाशिक यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा एकतिसावा लेखा परिक्षण अहवालासह वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.*

(९) *"जालना जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, जालना यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा सत्ताविसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.*

(१०) *"नाशिक जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, (लासलगांव) यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा सत्ताविसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.*

(११) *"महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन २०११-२०१२, सन २०१२-२०१३ व सन २०१३-२०१४ या वर्षांचा अनुक्रमे दहावा, अकरावा व बारावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.*

*तीन : "लोकलेखा समितीचा चोविसावा अहवाल सादर करणे."*

*चार : "अनुसूचित जाती कल्याण समितीचा आठवा अहवाल सादर करणे."*

*पाच : मा.सभापती यांचा प्रस्ताव -*

(क) *"९ ऑगस्ट या क्रांती दिनाला ७५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनातील हुतात्म्यांना आदरांजली अर्पण करणारा प्रस्ताव."*

(ख) "माननीय श्री.रामनाथ कोविंद यांची भारताच्या राष्ट्रपती पदी तसेच माननीय श्री. व्यकंय्या नायडू यांची भारताच्या उप राष्ट्रपती पदी निवड झाल्याबद्दल अभिनंदनपर प्रस्ताव."

सहा : मा.मुख्यमंत्री यांचा प्रस्ताव -

"भारताच्या माजी पंतप्रधान भारतरत्न स्वर्गीय श्रीमती इंदिराजी गांधी" यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त ; त्यांच्या कार्याचा गौरव करण्याबद्दलच्या प्रस्तावावर चर्चा.

सात : म.वि.प.नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने -

(१) श्री.अनिल भोसले, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ३७ वर मुख्यमंत्री निवेदन करतील:-

"पुण्यासह राज्यात दुर्धर आजारांवरील औषधांच्या किंमती महाग झाल्या असून महानगरपालिका प्रशासनाने होलसेलमधून औषधे खरेदी करुन रूग्णांना पुरविण्याची आवश्यकता."

(२) श्री.ख्वाजा बेग, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ४१ वर महसूल मंत्री निवेदन करतील :-

"मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे घोडबंदर, मिरे, महाजनवाडी व नवघर इत्यादी ठिकाणी ९ विकासकांनी शासनाची परवानगी न घेता मातीचे उत्खनन केले असून भर टाकण्यात आल्याचे उघडकीस येणे."

(३) ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ४२ वर शालेय शिक्षण मंत्री निवेदन करतील :-

"औरंगाबाद जिल्ह्यातील खाजगी शिक्षण संस्थांमध्ये बेकायदेशीर विद्यार्थी पटसंख्या दाखविण्यात आलेली असून अजिंठा, ता.सिल्लोड, जि.औरंगाबाद या शाळेमध्ये बेकायदेशीर व अवैधरित्या होत असलेला गैरप्रकार."

(४) श्री.कपिल पाटील, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ३८ वर उच्च व तंत्रशिक्षण मंत्री निवेदन करतील :-

"राजीव गांधी समकालीन अध्ययन केंद्र, मुंबई विद्यापीठ, मुंबई येथे २०१६-२०१७ मध्ये पूर्णवेळ समाजकार्य अभ्यासक्रम सुरू असून ह्या अभ्यासक्रमाची शुल्क भरण्याची विद्यार्थ्यांची क्षमता नसल्यामुळे

*या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची असलेली आवश्यकता."*

*(५) श्री.धनंजय मुंडे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ४० वर गृहनिर्माण मंत्री निवेदन करतील :-*

*"अंधेरी-कुर्ला रोड येथील प्रॉपर्टी विकसित करण्यासंदर्भात मेसर्स एच.डी.आय.एल. यांच्याकडून झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातील काही भ्रष्ट अधिकाऱ्यांना हाताशी धरुन एल.ओ.आय. घेण्याबाबत."*

*(६) श्री.अमरसिंह पंडित, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ४३ वर सहकार मंत्री निवेदन करतील :-*

*"बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे तत्कालीन अप्पर जिल्हाधिकारी, बीड यांनी बँकेच्या कारभारात केलेला गैरव्यवहार."*

*आठ : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) -*

*(१) (मंगळवार, दिनांक १ ऑगस्ट, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना) —*

*सर्वश्री. संजय दत्त, शरद रणपिसे, रामहरी रुपनवर, अशोक ऊर्फ भाई जगताप, आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, सर्वश्री. धनंजय मुंडे, जयवंतराव जाधव, सुनिल तटकरे, हेमंत टकले, अमरसिंह पंडित, सतिश चव्हाण, ॲड. निरंजन डावखरे, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री. आनंद ठाकूर,ॲड. राहुल नार्वेकर, सर्वश्री. किरण पावसकर, ख्वाजा बेग, वि.प.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-*

*"राज्यशासनाद्वारे राबविण्यात येणाऱ्या मुंबई-नागपूर या ७१० कि.मी. लांबीच्या समृध्दी महामार्गासाठी शेतकऱ्यांच्या शेतजमीनी, फळबागायती यांचे अधिग्रहण करण्यात येणार असून उक्त समृध्दी महामार्गासाठी बागायती, फळबागायती जमिनी देण्यास होणारा शेतकऱ्यांचा प्रचंड विरोध मोडून काढण्यासाठी राज्यशासन पोलीस बळाचा वापर करीत असणे, कल्याण तालुक्यातील फळेगाव येथे समृध्दी महामार्गासाठी विरोध करणाऱ्या १६ शेतकऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात येणे, राज्यात ठाणे, नाशिक, अहमदनगर, औरंगाबादसह १० जिल्हयातील ५० पेक्षा अधिक गावांमधून समृध्दी महामार्गासाठी जमीनी देण्यास शेतकऱ्यांकडून होत असलेला तीव्र विरोध लक्षात घेता या मार्गाबाबत राज्य शासनाने दडपशाहीने जमिनी घेणार नाही अशी आपली भुमिका जाहिर केलेली असताना ती भुमिका डावलून शेतकऱ्यांच्या जमिनी दडपशाहीने ताब्यात घेण्याचा प्रकार सुरु*

असणे, मुंबई-नागपूर या समृध्दी महामार्गामध्ये २७ गावांतील हजारो हेक्टर जमीन लॅण्ड पुलिंग अंतर्गत संपादित केली जाणार असणे, समृध्दी महामार्गाला होणारा शेतकऱ्यांचा विरोध मोडून काढण्यासाठी आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांमध्ये फुट पाडण्याचा डाव सुरु असणे, त्यासाठी काही भागातील शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी ८४ लाख रुपयांपर्यंत मोबदला देण्याचे आमीष दाखविण्यात येत असणे, मुंबई-नागपूर समृध्दी महामार्गावरील रस्ते आणि मेगा सिटीसाठी शेजारी बड्या आजी-माजी सनदी अधिकाऱ्यांनी शेकडो हेक्टर जमीनीची खरेदी केलेली असणे, समृध्दी महामार्गाला शहापूर, भिवंडी, नाशिक जिल्हयातील तसेच या मार्गावरील इतर तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी तीव्र विरोध केला असून या विरोधात स्थापन झालेल्या संघर्ष समितीवर वनखात्याच्या जमीन मोजणीच्या कामात मज्जाव केल्याप्रकरणी पोलिसांद्वारे गुन्हा दाखल करण्यात येणे, त्यातच जिल्हाधिकारी नाशिक यांनी दिनांक ७ जुलै, २०१७ रोजी परिपत्रक काढून शेतकऱ्यांना मोठी आमिषे दाखवून शेतकऱ्यांची दिशाभूल करण्याचा केलेला प्रयत्न, एकटया नाशिक जिल्हयातील इगतपूरी व सिन्नर तालुक्यातील एकूण ८२११२ हेक्टर क्षेत्रापैकी ५६१४४ हेक्टर जमिन प्रकल्पात जाणार असल्याने या तालुक्यातील शेतकऱ्यांकडे २६०६८ हेक्टर इतके कमी क्षेत्र शिल्लक राहणार असल्याने आपल्या जमिनी प्रकल्पासाठी देण्यास शिवडे गावासह ४९ गावातील शेतकऱ्यांनी केलेला तीव्र विरोध, मुंबई व औरंगाबाद येथे झालेल्या कृती समितीच्या बैठकीत आंदोलनाची रुपरेषा निश्चित करुन समृध्दी महामार्गाच्या विरोधात ४९ गावांतील शेतकऱ्यांनी सामुहिकरित्या आत्महत्या करण्याचा शासनाला दिलेला इशारा, समृध्दी महामार्गास शेतकऱ्यांचा विरोध लक्षात घेता संघर्ष समितीबरोबर मा.मुख्यमंत्री यांच्या झालेल्या बैठकीत शेतकऱ्यांना विश्वासात घेऊनच या महामार्गाची निर्मिती केली जाणार असल्याच्या महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांना सूचना असुनही या सूचनांना संबंधित अधिकारी बगल देत असणे, सदर महामार्ग ज्या जिल्ह्यातून जाणार आहे त्या जिल्ह्यात पेट्रोल आणि डिझेलच्या विक्रीवर अधिभार लावण्याचा निर्णय घेण्याची सुरू असलेली कार्यवाही, त्यास जनतेचा विरोध होणार असणे, मुंबई-नागपूर या समृध्दी महामार्गासंदर्भात बळाचा वापर करुन पोलिस शेतकऱ्यांवर खोटे गुन्हे दाखल करीत असणे, मुंबई-नागपूर समृध्दी महामार्गासाठी एकूण किती जमिनींचे भूसंपादन करण्यात येणार आहे, त्यामुळे किती गावकरी/शेतकरी बाधित होणार आहेत व त्यांना कशाप्रकारे मोबदला देण्यात येणार

*आहे व त्यांचे कशा प्रकारे पुनर्वसन करण्यात येणार आहे, याबाबत शासनाची भुमिका स्पष्ट न होणे, त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये शासनाबाबत तीव्र असंतोष व संतापाची भावना निर्माण होणे, या समृध्दी महामार्गाच्या प्रकल्पामध्ये शेतकऱ्यांवर होत असलेल्या अन्यायबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रीया."*

*(शुक्रवार, दिनांक ४ ऑगस्ट, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना) — (अनुक्रमांक (२) ते (८) —*

*(२) सर्वश्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, हरिसिंग राठोड, शरद रणपिसे, संजय दत्त, वि.प.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील:-*

*"मुंबईतील चेंबुर मधील एम (पश्चिम) वॉर्डातील चटई तलाव सफाई कामात लाखोंचा भ्रष्टाचार झाला असल्याचे माहे जून, २०१७ दरम्यान निदर्शनास येणे, या तलावाच्या कामामध्ये भ्रष्टाचार सुरुच असून दरवर्षी या तलावाच्या सफाईसाठी पालिकेकडून १५ ते २० लाखांचा निधी मंजूर केला जाणे, तथापि दरवर्षी ही सफाई अर्धवटच केली जात असल्याने तलावातील घाण तशीच पडून राहून येथील नागरिकांच्या आरोग्याला गंभीर धोका होत असतानाही शासन याकडे करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण, त्यामुळे शासनाने गेल्या १० वर्षातील या तलावाच्या सफाईसाठी झालेल्या खर्चाची तपासणी करुन पालिकेच्या दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."*

*(३) श्री. गिरीशचंद्र व्यास, प्रा. अनिल सोले, श्री. नागोराव गाणार, वि.प.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील:-*

*"नागपूर शहराला हिरवेगार करण्याकरीता सन २०१२-१३ ते २०१५-१६ या ५ वर्षात नागपूर सुधार प्रन्यास मार्फत १९ कोटी रूपये खर्च करून १ लाख ६० हजार झाडे लावण्याचा प्रकल्प हाती घेण्यात येणे, या कार्यक्रमाकरीता येणारा खर्च १९ कोटी पेक्षा जास्त रकमेचा असल्यामुळे सदर झाडे लावण्याचे टेंडर पुणे येथील बी.व्ही.जी. कंपनीला अधिक दराने देण्यात येणे, यावरूनच या कंत्राटामध्ये ना.सु.प्र. मधील अधिकाऱ्यांचे हात गुंतलेले असल्याचे दिसून येणे, १ लक्ष ६० हजार झाडे लावण्याचा उपक्रम जर ना.सु.प्र.ने पूर्ण केला तर नागपूरच्या भौगोलिक क्षेत्रफळाचा विचार करता नागपूर शहर पुर्णपणे हिरवे गार झाले असते, मात्र प्रत्यक्षात १ लक्ष ६० हजार झाडे नागपूर*

*शहरात लावण्यातच आलेली नसल्याचे दिसून येणे, कंपनीला हे वृक्षारोपण चार महिन्यांच्या कालवधीत करावयाचे असणे, त्याप्रमाणे दर दिवशी साधारण १३३० वृक्ष लागवड करणे गरजेचे असणे, परंतु ते झालेले दिसत नसणे, सर्व वृक्षांच्या संरक्षणासाठी ट्री गार्ड लावणे गरजेचे असल्याचे कंत्राटामध्ये नमूद असणे, परंतु कुठेही ट्री गार्ड लावलेले न दिसणे, कंत्राटाप्रमाणे जर ट्री गार्ड चोरीला गेले अथवा तोडफोड होऊन नुकसान झाले तर ते सात दिवसांत स्वखर्चाने बदलून देणे गरजेचे असणे, परंतु आजमितीस बहुतांश झाडांना ट्री गार्डच नसणे, म्हणजेच ट्री गार्ड बसवलेले नसताना याबाबतची रक्कम काम न करताच उचल करण्यात येणे, सदर कंत्राटामध्ये जर उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही तर त्याबाबत कंत्राटदाराला दररोज प्रत्येक झाडामागे ३००० रुपये दंड ठोठावण्याची तरतूद असणे, मात्र असेही ना.सु.प्र.ने केलेले नसणे, सदर निविदेची देयके अधिकार नसताना ना.सु.प्र.च्या संबंधीत अधिकाऱ्यांनी मंजूर करणे व त्याची रक्कम कंत्राटदाराला अदा करण्यात येणे, मूळात ना.सु.प्र.ने कंत्राट दिलेल्या बी.व्ही.जी. कंपनीने १,६०,००० वृक्षांची रोपणे केलेलीच नसणे, जर असे केले असते व झाडे जरी मृत झाली असती तरी मात्र १,६०,००० वृक्षांपैकी अनेक वृक्षांची ट्री गार्ड जागेवर उभी राहीली असती; परंतु असेही प्रत्यक्षपणे दिसत नसणे, एकंदरीत ना.सु.प्र. ने वृक्षारोपणासाठी काढलेले १९ कोटी रुपयांचे टेंडर व त्यानंतर वृक्षारोपण व त्यातील ५० टक्के झाडे मृत झाली आहे असे दाखवणे हा बनावटीचा प्रकार असून ना.सु.प्र. व बी.व्ही.जी. कंपनी, पुणे यांनी संगनमताने फसवणूक केलेली असून १९ कोटी रुपयांचा भ्रष्टाचार केलेला असणे, त्यामुळे सदर प्रकरणी ना.सु.प्र.चे अधिकारी व संबंधीत कंपनीवर फसवेगिरीचा गुन्हा दाखल करून सदर प्रकरणाची सी.बी.आय कडून चौकशी करण्याची होत असलेली मागणी, तसेच याला जबाबदार कंत्राटदार व संबधीत अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."*

*(४) सर्वश्री. धनंजय मुंडे, जयवंतराव जाधव, सुनिल तटकरे, हेमंत टकले, अमरसिंह पंडित, सतिश चव्हाण, ॲड. निरंजन डावखरे, श्री. किरण पावसकर, ॲड. राहुल नार्वेकर, वि.प.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील:-*

*"मौजे आंबिवली ता.अंधेरी येथील जमीन सर्व्हे नं. १४२ अ नभूक्र. ८३३ पै. मालती वसंत हाटे ट्रस्ट यांना नाममात्र १ रुपया वार्षिक भुईभाडे आकारुन शासनामार्फत दिलेली असणे, सदर*

*संस्थाचालकांनी मूळ एक अधिक अतिरिक्त चार असे एकूण पाच चटई क्षेत्र निर्देशांक वापरुन रुग्णालयाच्या इमारतीचे बांधकाम केलेले असणे, सदर संस्थेस अनर्जित रक्कम १७४.८७ कोटी रुपये भरण्यास जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांनी आदेश पारीत केलेले असणे, सदर अनर्जित रक्कम वसूल करण्यास शासनाकडून दिरंगाई केली जात असणे, सदर रुग्णालयाचे बांधकाम करताना महानगरपालिकेने मंजूर केलेल्या नकाशा व्यतिरिक्त मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकाम केलेले असणे, यामुळे नागरीकांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, मात्र त्याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."*

*(५) सर्वश्री. धनंजय मुंडे, जयवंतराव जाधव, सुनिल तटकरे, हेमंत टकले, अमरसिंह पंडित, सतिश चव्हाण, ॲड. निरंजन डावखरे, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.बाळाराम पाटील, वि.प.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-*

*"मुंबईतील सायन - पनवेल महामार्गाच्या देखभाल दुरुस्तीच्या कामाची जबाबदारी सायन - पनवेल टोल्वेज या कंपनीकडे असतानाही सदर कंपनीने दुरुस्तीचे काम योग्य प्रकारे न केल्याने या महामार्गावर झालेल्या एका अपघातात दोघांचा मृत्यु होण्याची घटना माहे जून, २०१७ मध्ये वा त्या सुमारास घडणे, सदर महामार्गावरील टोलमधून लहान वाहनांना सूट दिल्याने शासनाने कंपनीला १०३ कोटी रुपयांची नुकसान भरपाई विलंबापोटी विलंब शुल्क देत असतानाही कंपनीने देखभाल दुरुस्तीचे काम योग्य पध्दतीने न करणे, त्यामुळे शासनाने स्वतंत्र निविदा काढून रस्त्याच्या देखभालीसाठी मागील ३ वर्षात ६ कोटी व या वर्षी पुन्हा ३ कोटी रुपयांचा खर्च करणे, या कंपनीने दुरुस्तीची अनेक कामे ज्यामध्ये पादचारी पूल, भूयारी मार्ग, निर्देशक पट्टे, खड्डयांची दुरुस्ती तसेच पथदिव्यांची दुरुस्ती योग्य प्रकारे न केल्याने होणारे अपघात व त्यातून नागरीकांचे होणारे मृत्यू, या मृत्यूस जबाबदार धरुन कंपनीच्या संचालकांविरुध्द कारवाई करण्याची आवश्यकता, सदर रस्त्यावरील अवजड वाहनांची विशेष पथक व तंत्रज्ञानाव्दारे मोजणी करुन कंपनीस देण्यात येत असलेल्या भरपाईचा फेर आढावा घेवून सदर रस्त्यावर मागील ३ वर्षात देखभाल दुरुस्तीसाठी झालेल्या खर्चाची कंपनीच्या नुकसान भरपाईतून वसूली करण्याची लोकप्रतिनिधींनी केलेली मागणी, देखभाल दुरुस्तीस हलगर्जीपणा केल्यामुळे कराराचा भंग होत असल्याने कंपनीचा करार रद्द करण्याची आवश्यकता, कंपनीच्या धोरणामुळे शासनाचे मोठ्या*

*प्रमाणात होणारे नुकसान, जनतेची होणारी जिवित व वित्त हानी टाळण्यासाठी कंपनीवर तात्काळ कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."*

(६) *सर्वश्री. किरण पावसकर, धनंजय मुंडे, हेमंत टकले, सुनिल तटकरे, नरेंद्र पाटील, ॲड. निरंजन डावखरे, सर्वश्री. अनिल भोसले, आनंद ठाकूर, ॲड. राहुल नार्वेकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, वि.प.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे गृहनिर्माण मंत्र्यांचे लक्ष वेधतील:- (चर्चा अपूर्ण) -*

*"मुंबईतील बोरीवली येथील देवीपाडा येथे झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाने मेसर्स सद्गुरु एन्टरप्रायजेसच्या विकासकांला ९ इमारती बांधण्याची मंजुरी देण्यात येऊन ९ इमारतीपैंकी विकासकाने ८ इमारती बांधून पूर्ण करणे, त्यापैकी इमारत क्र. १ ते ४ या इमारती झोपडपट्टीधारकांसाठी असून इमारत क्र. ५ ते ८ खुल्या विक्रीसाठी विकासकाने बांधलेल्या असणे, इमारत क्र.७ सिंधुदूर्ग एस.आर.ए सह.गृहनिर्माण संस्था ही विकासकाने असहकार तत्वावर नोंदणीकृत केलेली असून या संस्थेत १५० मध्यमवर्गीय सभासद वास्तव्यास असणे, या इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झालेले असून इमारत क्र. ८ सद्गुरु मिलेनियम टॉवर सहकारी गृहनिर्माण संस्था या संस्थेला विकासकांच्या असहकार्यामुळे भोगवटा प्रमाणपत्र अद्यापही देण्यात न येणे, इमारत क्र. ७ व ८ यामध्ये असणारी जागा उद्यानासाठी आरक्षित ठेवण्यात आलेली असून अद्यापही विकासकाने जाणुनबुजून याठिकाणी उद्यान बांधलेले नसणे, तसेच या इमारतींच्या मलकुंडावरुन* (Septic Tank) *विकासकाकडून अनधिकृतरित्या खोदकाम तसेच रस्ता करण्यात तयार करण्यात येणे, त्यामुळे मल कुंडाची नासधूस होऊन त्यातून घाणीचे उत्सर्जन होऊन परिसरातील सार्वजनिक आरोग्य धोक्यात येण्याची भीती, या मोकळया व राखीव असलेल्या ठिकाणी विकासक प्रकल्पबाधितांसाठी महानगरपालिकेस देय असलेल्या जागेवर स्वतंत्र इमारत बांधण्याचा प्रयत्न करीत असल्याची बाब नुकतीच उघडकीस येणे, त्यामुळे तेथील रहिवाश्यांत पसरलेला तीव्र असंतोष, या सर्व प्रकरणाची चौकशी करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही, करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."*

(७) *श्री. प्रविण दरेकर, वि.प.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे गृहनिर्माण मंत्र्यांचे लक्ष वेधतील:-*

*"खोटे प्रतिज्ञापत्र व कागदपत्रांद्वारे गृहनिर्माण सोसायटीची*

*स्थापना करुन शासन व म्हाडाची सुमारे ४० कोटींची फसवणूक केल्याप्रकरणी चेंबूर येथील टिळकनगर पोलिस ठाण्यात सोसायटीच्या माजी पदाधिका-यासह सहा जणांविरुध्द गुन्हे दाखल होणे, यामध्ये एक पोलिस आयुक्त, माजी पोलीस निरिक्षक, आणि प्रत्येकी दोन हवालदार व बांधकाम व्यावसायिकांचा समावेश असणे, यामध्ये शासन व म्हाडाच्या २० टक्के घरांची परस्पर विक्री करुन अपहार करण्यात येणे, खोटी कागदपत्र तयार करुन शासन व म्हाडाची फसवणूक करण्याच्या प्रकरणांमध्ये दिवसेंदिवस होत असलेली वाढ, उपरोक्त प्रकरणी दोषी असणाऱ्यांवर कडक कारवाई होण्याची नितांत आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने सखोल चौकशी करुन शासन स्तरावर करावयाची कार्यवाही, शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."*

*(८) सर्वश्री. विनायकराव मेटे, आनंद ठाकूर, हेमंत टकले, जगन्नाथ शिंदे, सुनिल तटकरे, गोपीकिसन बाजोरिया, वि.प.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उर्जा, नवीन व नवीकरणीय उर्जा मंत्र्यांचे लक्ष वेधतील:-*

*"अकोला जिल्ह्यातील बाळापुर येथील पारस औष्णिक वीज प्रकल्प १२०० मेगावॅट वीज निर्मिती प्रकल्पात टप्याटप्याने सुरू करण्याचे नियोजन तत्कालीन सरकारने करणे, यासंदर्भात राज्य व केंद्र सरकारद्वारे शासनस्तरावरच नियोजनबध्द पध्दतीने आखणी करण्यात येऊन आवश्यक त्या बाबींची तरतूदही करणे, असे असतानाही सद्य:स्थितीत राज्यशासनाकडून वीज प्रकल्पाच्या विस्तारीकरणासाठी होत असलेला विलंब व विरोध, या प्रकल्पात ६६० मेगावॅट ऐवजी केवळ २५ मेगावॅट या सौर उर्जा प्रकल्प राबविण्याचा राज्यशासनाने घेतलेला निर्णय, परिणामी स्थानिक प्रकल्पग्रस्त, शेतकरी तसेच बेरोजगार यांच्यामध्ये शासनाबद्दल निर्माण झालेला तीव्र संताप, महिला संस्था तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींकडून या सौर ऊर्जा प्रकल्पास होत असलेला विरोध, या विरोधात ग्रामस्थांनी मोठया संख्येने आंदोलन छेडण्याचा दिलेला इशारा, सदर प्रकल्प राबविताना फक्त १२०० मेगावॅटचा वीज निर्मिती प्रकल्प राबविण्याची गरज, यावर शासनाने तातडीने केलेली कार्यवाही, करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."*

*(मंगळवार, दिनांक ८ ऑगस्ट, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना) — (अनुक्रमांक (९) ते (१३) —*

*(९) श्री. सुनिल तटकरे, वि.प.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील:-*

*"रायगड जिल्हयातील मुरुड-जंजिरा नगरपरिषदेत सन २०११ पासून अनेक गैरप्रकार व शासकीय निधीचा होत असलेला अपहार तसेच न केलेल्या कामांची बीले अदा करण्यात आल्याची बाब नुकतीच उघडकीस येणे, रस्त्यांच्या कामांमध्ये नियमाप्रमाणे खोदाई न करता १०० ते १५० ट्रक खडी-माती काढल्याचे दाखवून त्यावर एकंदर २८ लाखांपेक्षा जास्त रक्कम काम न करता उचलण्यात येणे, एम.बी. वर मुख्याधिकारी यांची स्वाक्षरी नसताना देखील बिले अदा करण्यात आलेली असणे, तसेच एम.बी. पुस्तिकेमधील मापांमध्ये अनियमितता झाल्याचे स्पष्ट दिसत असणे, नळपाईप लाईनचे काम जीवन प्राधिकरण यांचेमार्फत झालेले असताना व त्या कामाचे पैसे जीवन प्राधिकरणाने दिलेले असतानाही, नगरपरिषदेमार्फत १७ लाखांचे बील काढण्यात आलेले असणे, साडेतीन कि.मी. पाईपलाईन व डिझेलपंप सुस्थितीत असतानाही ते भंगारात विकण्यात येणे, त्यामुळे शासकीय निधीचा करोडो रुपयांचा अपहार होणे, याबाबत तेथील नगरसेवकांनी शासनस्तरावर तक्रारी करुनसुध्दा अद्यापही कोणतीच कारवाई न होणे, त्यामुळे जनमानसात पसरलेले कमालीचे संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."*

*(१०) डॉ. सुधीर तांबे, वि.प.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधतील:-*

*"अहमदनगर शहरात कायम बहुचर्चित राहिलेल्या उड्डाणपुलाचे काम रखडलेले असल्याने शहराचा विकास रखडलेला असणे, त्यामुळे शहरातील नागरिकांचे जीवन धोक्यात आले असून शहरामधून जाणाऱ्या औरंगाबाद राज्य महामार्गाच्या कामात उड्डाणपुलाच्या कामाचा देखील समावेश असणे, परंतु संबंधित कंपनी पुलाचे काम करण्यास तयार नसल्यामुळे अर्धवट स्थितीत असलेला रस्ता व उड्डाणपुलाचे कामही पूर्ण न झाल्याने शहराच्या विकासास येत असलेली बाधा, या कामांबाबत वारंवार संबधित प्रशासनाकडे तक्रार व निवेदने देऊनही प्रशासनाचे याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, त्यामुळे अहमदनगर शहरातील नागरिकांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची व नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करुन अनेक वर्षापासून रखडलेल्या या पुलाचे बांधकाम पूर्ण करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."*

*(११) सर्वश्री. ख्वाजा बेग, किरण पावसकर, वि.प.स. पुढील तातडीच्या व*

*सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे गृहनिर्माण मंत्र्यांचे लक्ष वेधतील:-*

*"मुंबईतील बांद्रा-खार परिसरात मोठ्या प्रमाणावर खाजगी विकासकांकडून इमारतींचा होत असणारा पुनर्विकास, सदर परिसरात (१.) मे. के. मुरर्दानी रियालिटी, सी.टी.एस.नं.ई/१४४, व्हीलेज, बांद्रा-खार (प) मुंबई (२.) मे. के. मुरर्दानी रियालिटी, जी/६१०, व्हीलेज, बांद्रा-खार (प) मुंबई (३.) एम.एन.के.बिल्डर्स प्रा.लि. सी.टी.एस.नं.ई/१७०, १६ वा रस्ता खार (प) मुंबई. (४.) मे. मुरर्दानी रियालिटी, सी.टी.एस.नं.ई/३८८, व्हीलेज, बांद्रा-खार (प) मुंबई (५.) परमवीर कन्स्ट्रक्शन, एल.एल.पी. व्हीलेज, बांद्रा-खार (प) मुंबई (६.) मार्क कन्स्ट्रक्शन, एल.एल.पी. व्हीलेज, बांद्रा-खार (प) मुंबई. (७.) स्कायलाईन व्हेंचर, एल.एल.पी. व्हीलेज, बांद्रा-खार (प) मुंबई. (८.) स्कायलाईन हॉस्पिटॅलिटी, एल.एल.पी. व्हीलेज, बांद्रा-खार (प) मुंबई. या कंपन्यांनी मुंबईतील विकासक नियंत्रण नियमावली डी.सी.आर. ३३ (१४) च्या अंतर्गत झोपडपट्टी विकास प्राधिकरणाकडे प्रस्ताव सादर करणे, डिसी.आर. ३३ (१४) च्या अनुषंगाने विकासकाने विनामूल्य संक्रमण शिबिरातील गाळे ( ट्रांन्झीट टेनामेंट ) बांधून दिले तर त्याबदल्यात विकासकाला अधिक क्षेत्रफळ मिळू शकेल, या करारानुसार या कंपन्यांनी ३३ (१४) च्या अनुषंगाने बांद्रा-खार परिसरातील बहुमजली इमारतींचे केलेले बांधकाम त्यात ३३ (१४) अंतर्गत शासनाच्या अटी शर्तींचे पालन न करणे, नियमाप्रमाणे अद्यापी ट्रांन्झीट टेनामेंट बांधून न देणे, विकासकांनी या बहुमजली इमारतीमधील सर्व फ्लॅट विकले असून त्यांना पाणी पुरवठा व वीज पुरवठा देण्यात येणे, वर नमूद केलेल्या विकासकांनी नियमाप्रमाणे एस.आर.ए. ला सुमारे २१० पेक्षा अधिक गाळे उपलब्ध करुन एस.आर.ए.च्या ताब्यात देणे बंधनकारक असतानाही गाळे अद्यापी ताब्यात न देणे, परिणामी शासनाचे सुमारे ५०० ते ७०० कोटींचे झालेले नुकसान, विकासकांकडून झालेल्या फसवणुकीबाबत खार पोलीस ठाणे येथे विकासकांविरुध्द गुन्हा नोंदवूनही अद्यापी कोणतीही कारवाई न होणे, परिणामी जनमानसात पसरलेला तीव्र असंतोष, शासनाबद्दल निर्माण झालेली संतापाची भावना, सदर गुन्हा आर्थिक गैरव्यवहाराचा व शासनाच्या फसवणूकीचा असल्याने शासनाने सदर गुन्हा आर्थिक गुन्हे शाखेकडे पाठवून (ई.ओ.डब्ल्यु मार्फत) सखोल चौकशी करुन वरील कंपन्यांना काळया यादीत समाविष्ट करुन कठोर कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."*

*(१२) डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, वि.प.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक*

*महत्त्वाच्या बाबीकडे उद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधतील:-*

*"रायगड जिल्ह्यात दिल्ली मुंबई औद्योगिक कॉरिडॉरअंतर्गत होऊ घातलेल्या दिघी पोर्ट इंडस्ट्रियल एरिया या प्रकल्पासाठी राज्य शासनाने शेतकऱ्यांकडून गेल्या चार वर्षापूर्वी जमिन संपादित करणे, या संपादनाविरुध्द कार्यकर्त्यांनी आणि स्वयंसेवी संस्थांनी आंदोलन केल्यानंतर संपादनातील क्षेत्र ६७,५०० एकरावरुन कमी करुन सुमारे १५८६५ एकर पर्यंत करण्यात येणे, सन २०१३ मध्ये कॉरिडॉरच्या केंद्रीय महामंडळाने सदर संपूर्ण क्षेत्र संपादनातूनच वगळण्याचा आदेश लेखी पत्राद्वारे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने देणे, असे असतांनाही तत्कालिन उद्योग मंत्री यांनी या निर्णयाला न जुमानता संपादन सुरु ठेवणे, म.औ.वी.अ.नियम, १९६१ अन्वये ही प्रक्रिया सुरक्षित असून कोणतीही सक्ती शेतकऱ्यांवर करणार नसल्याचे सांगूनही या परिसरातील १० गावांच्या भातशेती व सिंचित जमिनी जबरदस्तीने घेण्याची प्रक्रिया शासनाने सुरु ठेवणे, शासकीय अधिकाऱ्याद्वारे शेतकऱ्यांवर दलालांमार्फत दबाव आणण्यात येऊन शेतकऱ्यांना धमकवण्यात येणे, तसेच भूसंपादन अधिकाऱ्यांद्वारे संयुक्त जमिन मोजणी न करताच रक्कम वाटण्यात येणे, त्याचबरोबर शेतकऱ्यांकडून संमतीपत्रात सदर नुकसान भरपाई बाबत कोणत्याही न्यायालयात मी दाद मागणार नाही, आक्षेप घेणार नाही आणि घर बांधकाम, झाडे, विहिर यांची कोणतीही नुकसान भरपाई मागणार नाही व शासकीय नोकरीसाठी आम्ही अनुज्ञेय नाही असे लिहून घेण्यात येणे, त्याचबरोबर या संपादनाची कलम ३२/२ ची नोटीस अनेकांना न पोचणे, अनेक मयतांच्या नावाने नोटीसा काढण्यात आल्याने वारसापर्यंत नोटीसा न पोहोचणे, यामुळे प्रत्यक्षात फक्त १६ टक्के जमिनधारकांनी संमती दिलेली असणे, ३५ टक्के शेतकऱ्यांनी हरकत घेणे मात्र ४७ टक्के शेतकरी हरकत घेऊ न शकणे तरीही त्यांनी संमती दिल्याचे गृहित धरुन बळजबरीचे धोरण अवलंबविण्यात येणे, सद्य:स्थितीत फक्त १० गावांची सुमारे ३२०० हे. जमिन संपादित करणार असे सांगून या दहा गावात ६८ टक्के जमिनीची संमती मिळाल्याचा दावा शासन करीत असणे, परिणामी येथील शेतकऱ्यांमध्ये शासनाच्या या उदासिनतेबाबत निर्माण झालेले असंतोष व संतापाचे वातावरण, याकरिता शासनाने तातडीने सक्तीचे संपादन थांबवून, आधी संमती दिलेल्या शेतकऱ्यांची बेकायदेशीर संमतीपत्रे रद्द करुन त्यांना सन २०१३ च्या जमिन संपादन कायद्यानुसार भरपाई व पुनर्वसन देण्याची आवश्यकता, संमती मिळालेल्या जमिनीत असणारे कुळाचे, खंडकरी शेतकरी, शेतमजूर यांचे अधिकार नोंदविण्याची*

*आवश्यकता तसेच त्यामध्ये झालेले फसवणूकीचे व्यवहार रदद करण्यासाठी विशेष समिती नेमण्याची गरज, उर्वरित ६८ गावांतील शेतकऱ्यांचा सातबारा वरील संपादनाचे शिक्के काढून ते क्षेत्र विनाअधिसूचित करण्याची आवश्यकता, नुकसानभरपाईच्या वाटपात सुरु असलेल्या भ्रष्टाचाराची महसूल खात्याकडून चौकशी करुन दोषींवर कार्यवाही करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."*

*(१३) सर्वश्री. श्रीकांत देशपांडे, धनंजय मुंडे, दत्तात्रय सावंत, बाळाराम पाटील, डॉ.सुधीर तांबे, सर्वश्री.विक्रम काळे, सतीश चव्हाण, कपिल पाटील, नागोराव गाणार, जयवंतराव जाधव, प्रा.जोगेन्द्र कवाडे, प्रा.अनिल सोले, सर्वश्री.सुनिल तटकरे, हेमंत टकले, अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, वि.प.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्र्यांचे लक्ष वेधतील:-*

*"राज्यातील आर्थिक दृष्टया दुर्बल सामाजिक आरक्षित संवर्गातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक संस्थेचे शुल्क कुणाला १००%, कुणाला ५०% प्रतिपूर्ती करण्याचे शासनाचे धोरण असणे, शैक्षणिक वर्ष २०१६-१७ या आर्थिक वर्षातील प्रतिपूर्ती आजपर्यंत न होणे, २०१७-१८ मधील विद्यार्थ्यांनी अर्ज करण्यासाठी असलेले पोर्टल गेल्या तीन महिन्यांपासून बंद असणे, यामुळे २०१६-१७ व २०१७-१८ मधील हजारो विद्यार्थ्यांची प्रतिपूर्ती न होणे, मागासप्रवर्गातील विद्यार्थ्यांना मिळणारी शिष्यवृत्ती शैक्षणिक वर्ष २०१५-१६ संपले तरी अद्याप मिळालेली नसणे, औरंगाबाद विभागातील ४८०३९ एवढे विद्यार्थी शिष्यवृत्तीच्या प्रतिक्षेत असणे, शिष्यवृत्तीसाठी संस्था व विद्यार्थ्यांनी संबंधित विभागाकडे चकरा मारुनही त्यांना विविध कारणे सांगून शिष्यवृत्ती दिली जात नसणे, फक्त औरंगाबाद जिल्हयातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी ६५ कोटी रुपयांची गरज असणे, शैक्षणिक वर्षात शिष्यवृती मिळत नसल्याने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य घेण्यास अडचणी येत असणे, यामुळे खाजगी विनाअनुदानित शिक्षक शिक्षकेतर व व्यवस्थापन यांच्यावर आर्थिक संकट ओढविणे, परिणामी विद्यार्थ्यांकडून सक्तीची वसुली होणे, यामुळे पालक, विद्यार्थी, व्यवस्थापन, शिक्षक, शिक्षकेतर यांच्यामध्ये पसरलेला तीव्र असंतोष, या प्रकरणी २०१५-१६, २०१६-१७ व २०१७-१८ या शैक्षणिक वर्षांची शिष्यवृत्ती लवकरात लवकर विद्यार्थ्यांना देण्याबाबत होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."*

*नऊ : म.वि.प. नियम १०१ - अ अन्वये विशेष उल्लेख - (असल्यास).*

*दहा : (मंगळवार, दिनांक ८ ऑगस्ट, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा) — सर्वश्री. अमरसिंह पंडित, सतिश चव्हाण, विक्रम काळे, वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा —*

*"सिंचनाच्या अपुऱ्या सुविधा, शेतीमालाचे पडलेले भाव आणि दरवर्षी पडणाऱ्या दुष्काळामुळे मराठवाडयातील शेतकरी हवालदिल होणे, सततच्या नापीकी आणि कर्जबाजारीपणामुळे मराठवाडयात शेतकरी आत्महत्येचे प्रमाण लक्षणियरित्या वाढणे, मागील दोन वर्षात २१८३ शेतकऱ्यांनी आत्महत्या करणे, यामध्ये तरुणांचे प्रमाण २५ टक्क्याहून अधिकचे असणे, मराठवाडयाच्या हक्काच्या पाण्याच्या वापरासाठी शासन कोणतीही उपाययोजना करत नसल्यामुळे मध्य गोदावरी खोऱ्यातील १८.३३ टीएमसी पाणी आंध्रप्रदेशात वाहून जात असणे, कायद्याची पायमल्ली करुन उर्ध्व गोदावरी खोऱ्यात गोदावरी नदीपात्रातील पाणी अडविण्यात आल्याने मराठवाडयातील शेतकऱ्यांवर मोठा अन्याय होणे, नविन सिंचन प्रकल्प आणि जुन्या प्रकल्पांच्या सुप्रमांची कामे रेंगाळल्यामुळे मागील तीन वर्षात मराठवाडयात एकही मोठया सिंचन प्रकल्पाचे काम सुरु नसणे, सक्षम जल आयुक्तालय स्थापन करण्याच्या निर्णयासह औरंगाबाद येथील मंत्रीमंडळाच्या बैठकीत झालेल्या निर्णयाची प्रत्यक्ष अंमलबजावणी होत नसणे, कृषीपंपाच्या विद्युतीकरणाचा वाढलेला अनुशेष आणि सततच्या खंडित विज पुरवठयामुळे शेतकरी अडचणीत सापडणे, पिक विमा योजनेचा हप्ता भरुन घेतांना घातलेल्या जाचक अटींमुळे लाखो शेतकरी योजनेच्या लाभापासून वंचित राहण्याचा धोका निर्माण होणे, तुर खरेदी, दहा हजार रुपये तातडीचे कर्ज आणि कर्जमाफीच्या अंमलबजावणीसाठी शासनाला आलेले अपयश यामुळे मराठवाडयातील शेतकऱ्यांमध्ये पसरलेला शासन विरोधी तिव्र असंतोष आणि संतापाची भावना, शेतकऱ्यांना धीर देण्यासाठी शाश्वत शेतीच्या संदर्भात शासनाने धोरणात्मक निर्णय घेवून करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."*

## *— मध्यंतर —*

*अकरा : शासकीय विधेयके -*

*(क) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे - विचार, खंडशः विचार व संमत करणे.*

*(१) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ३७ - महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१७"*

*विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. धनंजय*

*मुंडे, शरद रणपिसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ३७ - महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त दोन महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."*

*(१) मुख्यमंत्री*
*(२) श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेता तथा वि.प.स.*
*(३) श्री.नारायण राणे, वि.प.स.*
*(४) श्री.शरद रणपिसे, वि.प.स.*
*(५) ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स.*
*(६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.*
*(७) श्री.सतिश चव्हाण, वि.प.स.*
*(८) डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स.*
*(९) श्री.कपिल पाटील, वि.प.स.*
*(१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.*

-----------------------------------------------------------------
------

*(२) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ३८ - महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता (सुधारणा) विधेयक, २०१७"*
*विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. शरद रणपिसे, धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ३८ - महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता (सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त दोन महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."*

*(१) ग्रामविकास मंत्री*
*(२) श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेता तथा वि.प.स.*
*(३) श्री.शरद रणपिसे, वि.प.स.*
*(४) श्री.संजय दत्त, वि.प.स.*
*(५) ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स.*
*(६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.*
*(७) श्री.सतिश चव्हाण, वि.प.स.*
*(८) डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स.*

*(९) श्री.कपिल पाटील, वि.प.स.* *(१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.*

------------------------------------------------------------------------

*(३) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ४३ - महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०१७"*

*विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. शरद रणपिसे, धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ४३ - महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त दोन महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."*

| | |
|---|---|
| *(१) महसूल मंत्री* | *(२) श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेता तथा वि.प.स.* |
| *(३) श्री.शरद रणपिसे, वि.प.स.* | *(४) श्री.संजय दत्त, वि.प.स.* |
| *(५) ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स.* | *(६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.* |
| *(७) श्री.सतिश चव्हाण, वि.प.स.* | *(८) डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स.* |
| *(९) श्री.कपिल पाटील, वि.प.स.* | *(१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.* |

------------------------------------------------------------------------

*(४) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ४७ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता आणि महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीच्या वापराचे रुपांतर व अकृषिक आकारणी) नियम (सुधारणा) विधेयक, २०१७"*

*विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. शरद रणपिसे, धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ४७ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता आणि महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीच्या वापराचे रुपांतर व अकृषिक आकारणी) नियम (सुधारणा)*

*विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त दोन महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."*

| | |
|---|---|
| *(१) महसूल मंत्री* | *(२) श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेता तथा वि.प.स.* |
| *(३) श्री.शरद रणपिसे, वि.प.स.* | *(४) श्री.संजय दत्त, वि.प.स.* |
| *(५) ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स.* | *(६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.* |
| *(७) श्री.सतिश चव्हाण, वि.प.स.* | *(८) डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स.* |
| *(९) श्री.कपिल पाटील, वि.प.स.* | *(१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.* |

-----------------------------------------------------------------------

*(५) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ४१ - महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन)(सुधारणा) विधेयक, २०१७" विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. शरद रणपिसे, धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ४१ - महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन)(सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त दोन महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."*

| | |
|---|---|
| *(१) पणन मंत्री* | *(२) श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेता तथा वि.प.स.* |
| *(३) श्री.शरद रणपिसे, वि.प.स.* | *(४) श्री.संजय दत्त, वि.प.स.* |
| *(५) ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स.* | *(६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.* |
| *(७) श्री.सतिश चव्हाण, वि.प.स.* | *(८) डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स.* |
| *(९) श्री.कपिल पाटील, वि.प.स.* | *(१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.* |

-----------------------------------------------------------------------

*(ख) विधानसभेने संमत केल्यास - विचार, खंडश: विचार व संमत करणे.*

*(१) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ५० - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१७"*

*(२) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ५३ - महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षण विधेयक, २०१७"*

*(३) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ५४ - महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) विधेयक, २०१७"*

---------------------------------------------------------------------------------------

*(ग) विधानसभेने संमत केल्यास — विधेयक विचारात घेणे -*

*"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ४९ - महाराष्ट्र मुद्रांक (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१७"*

---------------------------------------------------------------------------------------

*(घ) विधानसभेने सुधारणांसह दुसऱ्यांदा संमत केल्याप्रमाणे - विचार, खंडश: विचार व संमत करणे.*

*(१) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक २ - मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१७"*

*(२) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ४ - मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१७"*

---------------------------------------------------------------------------------------

*(ङ) विधानसभेने दुसऱ्यांदा संमत केल्याप्रमाणे - विचार, खंडश: विचार व संमत करणे.*

*(१) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १० - भारतीय भागीदारी (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१७"*

*(२) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १२ - शिकाऊ उमेदवार (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१७"*

*(३) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १६ - महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१७"*

*(४) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक २४ - महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (निरर्हता दूर करणे) (सुधारणा) विधेयक, २०१७"*

---------------------------------------------------------------------------------------

बारा : *(मंगळवार, दिनांक ८ ऑगस्ट, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेले म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) — (अनुक्रमांक (क) व (घ)) —*

*(क) सर्वश्री. शरद रणपिसे, धनंजय मुंडे, नारायण राणे, सुनिल तटकरे, संजय दत्त, हेमंत टकले, अशोक ऊर्फ भाई जगताप, जयंत पाटील, प्रा. जोगेन्द्र कवाडे, श्री.कपिल पाटील, ॲड. जनार्दन चांदुरकर, आर्कि.अनंत गाडगीळ, सर्वश्री.अमरसिंह पंडित, सुभाष झांबड, किरण पावसकर, चंद्रकांत रघुवंशी, जयवंतराव जाधव, रामहरी रुपनवर, श्रीमती विद्या चव्हाण, श्रीमती हुस्नबानू खलिफे, सर्वश्री.सतिश चव्हाण, अमरनाथ राजुरकर, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री. सतेज ऊर्फ बंटी पाटील, ख्वाजा बेग, डॉ. सुधीर तांबे, सर्वश्री.आनंद ठाकूर, हरिसिंग राठोड, अब्दुल्ला खान दुर्राणी, आनंदराव पाटील, विक्रम काळे, नरेंद्र पाटील, ॲड.जयदेव गायकवाड, ॲड.राहुल नार्वेकर, सर्वश्री. प्रकाश गजभिये, रामराव वडकुते, जगन्नाथ शिंदे, वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव — (चर्चा व मंत्र्यांचे उत्तर) —*

*"मुंबईसह राज्यातील महानगरपालिका, नगरपालिका व नगरपंचायती यांची डबघाईला आलेली आर्थिक परिस्थिती, नवनिर्मित नगरपंचायतींमध्ये असलेले अधिकारी व कर्मचाऱ्यांची रिक्त पदे, त्यामुळे विकासकामात होत असलेले अडथळे, सर्व महानगरपालिकांमध्ये पायाभूत सुविधांचा उडालेला बोजवारा व पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली समस्या, मालमत्ता कराच्या संकलनात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार होत असणे, जी.एस.टी. मुळे महानगरपालिकांना एलबीटीची प्रतिपूर्ती करण्यात न आल्यामुळे महानगरपालिका व नगरपालिका यांची अर्थव्यवस्था कोलमडून जाणे, मुंबई महानगरपालिकेतील रस्ते, नालेसफाई व डंपिंगच्या संदर्भातील गैरकारभाराच्या चौकशीचे आदेश मा.मुख्यमंत्र्यांनी देऊन त्यावर पुढे कोणतीच कार्यवाही न होणे, जेएनएनयूआरएम योजना बंद केल्यामुळे अपूर्ण राहिलेल्या प्रकल्पासंबंधी शासनाची भूमिका, केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियानाचा उडालेला बोजवारा, बहुतांशी नगरपरिषदांत चटईक्षेत्र, टीडीआर व ऑटो डीसीआर घोटाळे शासनाच्या निदर्शनास आणून अद्यापही कोणतीच कारवाई न होणे, राज्य शासनाने रियल इस्टेट कायदा मंजूर करणे, केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्याने रियल इस्टेट कायदा मंजूर केल्यानंतर बांधकाम व्यावसायिकांमध्ये निर्माण झालेली चिंतेची परिस्थिती, या कायद्याच्या अंमलबजावणीमुळे शासनाकडूनच निर्माण होत असलेले अडथळे, मुंबईतील मैदानांचा*

*लिलाव, गृहनिर्माण धोरण अनिश्चिततेमुळे रखडलेले गृहनिर्माण प्रकल्प, एसआरए अंतर्गत रखडलेले प्रकल्प व धारावी पुनर्विकास प्रकल्प, म्हाडा वसाहती, बीडीडी, बीआयटी चाळी व उपकरप्राप्त इमारतींचा रखडलेला पुनर्विकास, संक्रमण शिबीरातील घुसखोरीचा प्रलंबित प्रश्न, मुंबई शहरासह अन्य महानगरांमध्ये निर्माण झालेली वाहतुकीची समस्या, बेस्ट प्रशासन व मुंबई महापालिका आयुक्त यांच्यातील संघर्ष विकोपाला जाणे, मुंबई महापालिका, एमएमआरडीए, म्हाडा आणि सिडको यांच्यात असलेला समन्वयाचा अभाव, सिडकोकडून देण्यात आलेल्या भूखंडाचा होणारा दुरुपयोग, विविध स्थानिक स्वराज्य संस्थातील सफाई कामगारांच्या समस्यांकडे झालेले दुर्लक्ष तसेच राज्यातील जनतेची अस्मिता असलेले मुंबईतील आंबेडकर भवन महानगरपालिकेने तोडण्यास परवानगी देणे, त्यामुळे राज्यातील सर्व महानगरपालिकांच्या नियोजनात राज्य शासन अपयशी ठरुन स्थानिक स्वराज्य संस्थांची आर्थिक कोंडी होऊन विकासाला बसलेला खीळ, त्यामुळे जनतेत पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."*

*(ख) सर्वश्री. धनंजय मुंडे, शरद रणपिसे, सुनिल तटकरे, नारायण राणे, हेमंत टकले, कपिल पाटील, विक्रम काळे, संजय दत्त, अमरसिंह पंडित, जयंत पाटील, अशोक ऊर्फ भाई जगताप, सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.सुधीर तांबे, सर्वश्री. दत्तात्रय सावंत, श्रीकांत देशपांडे, बाळाराम पाटील, किरण पावसकर, ॲड.जनार्दन चांदुरकर, सर्वश्री.जयवंतराव जाधव, रामहरी रुपनवर, श्रीमती विद्या चव्हाण, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.ख्वाजा बेग, आर्कि.अनंत गाडगीळ, सर्वश्री.अमरनाथ राजुरकर, आनंद ठाकूर, सुभाष झांबड, अब्दुल्लाखान दुर्राणी, प्रा.जोगेन्द्र कवाडे, सर्वश्री. चंद्रकांत रघुवंशी, नरेंद्र पाटील, प्रकाश गजभिये, राहुल नार्वेकर, सतेज ऊर्फ बंटी पाटील, हरिसिंग राठोड, आनंदराव पाटील, जयदेव गायकवाड, रामराव वडकुते, जगन्नाथ शिंदे, वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव —*

*"प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षण, वैद्यकीय शिक्षणाची जबाबदारी असणाऱ्या शालेय शिक्षण, उच्च व तंत्रशिक्षण, वैद्यकीय शिक्षण या विभागांना आपापल्या शैक्षणिक जबाबदाऱ्या योग्य पध्दतीने पार पाडण्यात अपयश आल्याने राज्यातील लाखो विद्यार्थी, पालक, शिक्षक, कर्मचारी आणि प्राध्यापकांची फरफट होत असणे, शाळाबाह्य मुलांच्या सर्वेक्षणाचा प्रश्न कायम असणे, विनाअनुदानीत*

*व स्वयं अर्थसहाय्यीत मराठी व इंग्रजी शाळांना आवश्यकता नसताना मोठ्या प्रमाणात मान्यता देण्यात येणे, खाजगी इंग्रजी माध्यमांच्या शाळा, महाविद्यालयांवर सरकारचा कोणताही अंकुश नसणे, पटपडताळणीनंतर ऑनलाईन संच मान्यतेत अनेक त्रुटी असणे, त्यामुळे अतिरिक्त शिक्षकांचा वेतनाचा व समायोजनाचा प्रश्न निर्माण होणे, परिणामी माहे मे, २०१२ पासून शिक्षकांची भरती न होणे, शिक्षकांच्या या नियुक्त्या चुकीच्या आहेत म्हणून कार्यरत ८००० शिक्षकांच्या नियुक्त्या रद्द करण्याचा चुकीचा निर्णय घेणे, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा आकृतीबंधाचा अहवाल मान्य न करणे, मुंबई बँकेतून शिक्षकांचा विरोध असताना पगार देण्यात येणे, रात्र शाळा, रात्र कॉलेजेस बंद करण्याचा निर्णय घेतल्याने तेथील शिक्षकांच्या नोकऱ्या संपुष्टात येणे, विना अनुदानीत शाळांना २० टक्क्याच्या पलिकडे अनुदानाची तरतूद न करणे, दिनांक १ व २ जुलै, २०१६ रोजी घोषित केलेल्या अनुदानास पात्र शाळांना वेतनाची तरतूद न करणे, अनुदानास पात्र शाळा, वर्ग तुकड्या व कनिष्ठ महाविद्यालयांच्या याद्या घोषित न करणे, उर्वरित सन २०१२ च्या वर्ग तुकड्या व उर्वरीत शाळा व कनिष्ठ महाविद्यालय यांचे मुल्यांकन सुरू करणे, १ हजार विद्यार्थी संख्या असलेल्या शाळेतील अर्धवेळ ग्रंथपालांना न्यायालयीन निर्णयाप्रमाणे पुर्णवेळ करणे, कला व क्रीडा शिक्षकांच्या तासिका कमी करणे, दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पुर्वीच्या व नंतरच्या शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करणे, ऑनलाईन वेतन प्रणालीत सुधारणा करुन वेतन महिन्याच्या एक तारखेला करणे, जिल्हा परिषद शाळांकडे सरकारचे दुर्लक्ष असणे, मराठवाड्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये मोठ्या प्रमाणात मुख्याध्यापकांचे व शिक्षकांची रिक्त पदे असणे, वर्ग-२ मुख्याध्यापकांना पदावनत करणे, सदरहू शाळांच्या इमारती मोडकळीस येणे, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शिक्षकांच्या बदल्यासंदर्भात काढलेला चुकीचा शासन निर्णय रद्द करण्याची होत असलेली मागणी, इयत्ता १० वी च्या विद्यार्थ्यांचे भाषा विषयाचे तोंडी गुण रद्द करणे, विना अनुदानित शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार व पुस्तके न मिळणे, गणवेश देण्याच्या ऐवजी रोख रक्कम विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्याचा चुकीचा निर्णय घेणे, अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांची मॅट्रीक व मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती देण्यास सरकारला अपयश येणे, मुंबई विद्यापीठाकडून घेण्यात आलेल्या बहुतांश अभ्यासक्रमांचे निकाल वेळेत न लागणे, विद्यापीठाचे आर्थिक नियोजन कोलमडणे, विद्यापीठाच्या शैक्षणिक, प्रशासकीय व आर्थिक बाबींचा कारभार*

*ढासळल्याने कुलगुरुंना हटविण्याची मागणी होत असणे, शासकीय तंत्रनिकेतन व अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या हजारो जागा रिक्त राहत असणे, तंत्रनिकेतन मधील कंत्राटी अधिव्याख्यातांना नियमित करण्याची मागणी, वैद्यकीय प्रवेशाच्या प्रक्रियेत बोगस डोमिसियल प्रमाणपत्राचा घोटाळा उघडकीस येणे, वैद्यकीय शिक्षण विभागात झालेल्या साहित्य खरेदीत मोठा घोटाळा उघडकीस येणे, महिला व बालकल्याण विभागाच्या खरेदीत घोळ असणे, सामान्य प्रशासन विभागाच्या वस्तु व सेवा खरेदी व नियुक्तीतील झालेले घोळ, वरील सर्व विभागामध्ये सुरू असलेला गोंधळ, त्यामुळे जनतेत पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."*

*(ग) डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.प्रविण दरेकर, ॲड.अनिल परब, श्री.गोपीकिसन बाजोरिया, श्रीमती स्मिता वाघ, सर्वश्री.रविंद्र फाटक, तानाजी सावंत, सुजितसिंह ठाकूर, प्रा.अनिल सोले, सर्वश्री.मितेश भांगडिया, डॉ.परिणय फुके, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव —*

*"मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत वाड्या, वस्त्या व ग्रामीण भागातील ७२०० किमी रस्त्याच्या लांबीचे सन २०१५-१६ व २०१६-१७ करिता उद्दीष्ट ठरविलेले असणे, त्या व्यतिरिक्त राज्याच्या ग्रामीण भागात, डोंगरी विभागात तसेच छोट्या वस्त्या, वाड्या यांना जोडणारे गावपोहोच रस्ते, मार्ग व छोटे पुल, मोरी, पांदण रस्ते यांच्या बांधकामाची व यांच्या दुरुस्तीची अपूर्ण कामे पूर्ण करण्याची आवश्यकता, राज्यातल्या ग्रामीण भागातील रस्त्यांच्या दर्जावाढीचे प्रस्ताव, एप्रिल, २००९ पासून राबविण्यात येत असलेल्या केंद्र शासनाची राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनाकरिता सन २०१५ पासून नविन कामांना निधी नसणे, व सन २०१६-१७ पासून राबविण्यात येत असलेल्या राज्य शासनाच्या मुख्यमंत्री ग्रामीण पाणी पुरवठा योजना यांच्या निकषात न बसणाऱ्या व पिण्याच्या पाण्याची सोय नसणाऱ्या राज्यातील गावे, वाडे, वस्त्या यांच्या पिण्याच्या पाण्याची सोय करणे, ग्रामीण भागातील सर्व वाड्या, वस्त्या व डोंगरी भागातील सर्व गावाचे विद्युतीकरण करण्याची आवश्यकता, शेती पाणी पुरवठा योजनेच्या वीज दरामध्ये झालेली दरवाढ, वीज बिलाची वसुली थांबविण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."*

*(घ) श्री.विनायक मेटे, ॲड.अनिल परब, सर्वश्री. प्रविण दरेकर, गिरीशचंद्र व्यास, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, प्रा.अनिल सोले, डॉ.परिणय फुके,*

*सर्वश्री.गोपीकिसन बाजोरिया, सुजितसिंह ठाकूर, रविंद्र फाटक, श्रीमती स्मिता वाघ, श्री.तानाजी सावंत, डॉ.अपूर्व हिरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव —*

*"राज्यात मोठ्या संख्येने मराठा समाजाची अनेक वर्षांपासून आरक्षणाची मागणी असणे, राणे समितीच्या शिफारशींना अनुसरुन मराठा समाजाला शिक्षण व नोकरीत १६% आरक्षण देण्याचा निर्णय शासनाकडून घेण्यात येणे, परंतु, त्या निर्णयाला मा.उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आल्याने मा.न्यायालयाकडून मराठा आरक्षणाच्या निर्णयास स्थगिती मिळणे, ही स्थगिती उठविण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न सुरू असणे, गेल्या दोन दशकात शेतीची झालेली दुरवस्था, त्यामुळे केवळ शेतीवर अवलंबून असलेल्या राज्याच्या ग्रामीण भागातील मराठा समाजाची आर्थिक परिस्थिती दिवसेंदिवस खालावत जाणे, परिणामी त्यांच्या मुलांची शैक्षणिक प्रगती न होणे, त्यामुळे इतर समाज गटांच्या तुलनेत आपण मागे पडतो याची खंत मराठा समाजाला अस्वस्थ करित असणे, त्याचे पडसाद राज्यातील जिल्ह्या-जिल्ह्यातून निघणाऱ्या मराठा समाजाच्या विराट मोर्चातून प्रतिबिंबित होणे, राज्य शासनाकडून त्याची त्वरीत दखल घेण्यात येऊन राज्यातील तरुणांना शैक्षणिक व स्वयंरोजगार क्षेत्रात स्वावलंबी बनविण्याच्या दृष्टीने कौशल्य विकासाचे शिक्षण देण्याकरिता "स्कील इंडिया" योजना राबविण्यात येणे, आदिवासी भागातील मुलांसाठी शैक्षणिक साहित्य पुरविण्याकरिता पंडित दीनदयाळ उपाध्याय आदिवासी विकास योजना राबविण्यात येणे, शासनाकडून आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शैक्षणिक शुल्कातील सवलत ६ लाख रुपयांपर्यंत वाढविण्याकरिता राजर्षी शाहू महाराज शैक्षणिक शुल्क प्रतिपुर्ती योजना राबविण्यात येणे, मागास आयोगाची निर्मिती करण्यात येणे, डॉ.पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह वेतन योजना राबविण्यात येणे, वसतीगृहात राहणाऱ्या मुलांना सुविधा पुरविण्याकरिता अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाची निर्मिती करुन या मंडळाकरिता भरघोस आर्थिक तरतुद करण्यात येणे, केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांची माहिती मिळण्याकरिता केंद्र शासनाची सारथी योजना राज्यात राबविण्यात येणे, या व इतर अनेक माध्यमातून राज्यातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक शैक्षणिकदृष्ट्या प्रगत होऊन व त्याला कौशल्य विकासावर आधारित स्वयंरोजगार मिळून तो स्वावलंबी होऊ शकेल अशी शासनाची भूमिका असणे, याखेरीज मराठा समाजाकडून सातत्याने*

*मराठा आरक्षणाची मागणी होत असल्याने हा विषय शासनाने मागासवर्ग आयोगाकडे सोपविला असणे, मागासवर्ग आयोगाने या विषयाचा सखोल अभ्यास करुन लवकरात लवकर अहवाल देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."*

*तेरा : अर्धा-तास चर्चा — म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) -*

*(१) श्री. शरद रणपिसे, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.*

*"पुणे शहराच्या पूर्व भागासाठी पाणीपुरवठा करण्यासाठी रुपये ३८० कोटी १६ लाख खर्चाची भामा-आसखेड योजना राबविण्याचा राज्य शासनाने निर्णय घेतला असणे, या योजनेच्या कामास माहे जानेवारी, २०१४ मध्ये सुरुवात झाली असणे, मात्र अद्यापही काम पूर्ण झालेले नसणे, केंद्र शासनाने सुमारे तीन वर्षापूर्वी जे.एन.एन.यू.आर.एम योजनेंतर्गत २५८ कोटी रुपयांचा निधी मंजूर केलेला असून त्यापैकी रुपये १०६ कोटी एवढा निधी पुणे महानगरपालिकेकडे दिलेला असणे, काम वेळेत पूर्ण न केल्यास उर्वरित निधी मिळण्यास अनेक अडचणी येण्याची शक्यता असणे, उपरोक्त योजनेचे काम वेळेत पुर्ण करुन पाणीपुरवठ्याचा गंभीर प्रश्न सोडवण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."*

*(२) श्री. नारायण राणे, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.*

*"राज्यात संगीत भजन, दशावतार, नमन, झाकडी नृत्य अशा अनेक प्रकारच्या लोककला जिवंत ठेवण्याचे काम लोक कलाकार करीत असणे, संगीत भजन, दशावतार यातून पुराणांचे दाखले देऊन हे कलाकार समाजाला चांगली दिशा देण्याचे काम करित असणे, मात्र या कलाकारांवर लाऊड स्पिकरचे रात्री १०.०० वाजेपर्यंतचे बंधन लादले जाणे, या कलाकारांना किमान रात्री १२.३० ते १.०० वाजेपर्यंत लाऊड स्पिकरचा वेळ वाढवून मिळणे, या कलाकारांना शासन वयाच्या ५० वर्षानंतर तुटपुंजे अनुदान देत असणे, याशिवाय ठराविकच प्रस्ताव मंजूर केले जाणे, त्यामुळे अनेक कलाकार अनुदानापासून वंचित राहणे, शासनाने राज्यात लोककला जिवंत ठेवण्यासाठी या कलाकारांना ४० वर्षापासून मानधनास पात्र ठरवून त्यांचे मानधन वाढवून देऊन जास्तीत जास्त कलाकारांचे मानधनाचे प्रस्ताव मंजूर करणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."*

*विधान भवन,*
*मुंबई,*
*दिनांक : ८ ऑगस्ट, २०१७.*

*उत्तमसिंग चव्हाण,*
*सचिव,*
*महाराष्ट्र विधानपरिषद.*